# नोटीस

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी (आरोग्य वर्धीनी) पंदाकरीता दि.१४/०२/२०१९ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचे दि.०२/०३/२०१९ च्या पत्राच्या अनुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी (आरोग्य वर्धीनी) निवड प्रक्रियेमध्ये काही धोरणात्मक बदल करावयाचे असल्याने उपरोक्त नमुद प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार सर्व उमेदवारांना सुचीत करण्यात येते की अर्जासोबत जोडलेले **Demand Draft** या कार्यालयातुन प्राप्त करुन घ्यावे.

आदेशानुसार

# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
## राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br>
फॅक्स – ०२२ – २२६४२२५५ <br>
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला, <br>
सेंट जार्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br>
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई


जा.क्र.राआसो/HWC/हेल्थ वेलनेस सेंटर/ पदभरती स्थगिती/ /१९ <br>
दि.२/०३/२०१९

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
जिल्हा परिषद (गडचिरोली, उस्मानाबाद,नंदुरबार,वर्धा,भंडारा,सातारा,चंद्रपुर,सिंधुदुर्ग, नांदेड,जळगांव,लातूर,अहमदनगर,पालघर,गोंदिया,नाशिक,पुणे,अमरावती,ठाणे,रायगड, यवतमाळ,नागपूर)

विषय:- हेल्थ वेलनेस सेंटर (आरोग्यवर्धिनी केंद्र) अंतर्गत करावयाच्या पदभरती व निवडप्रक्रियेबाबत.

संदर्भ:-१. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/आयुप/ हेल्थ विलनेस सेंटर/१०३२४३-२८२/१९ दि.८/०२/२०१९.<br>
२. दि.९/०२/२०१९ रोजीची दैनिक लोकमत व सकाळ वर्तमानपत्रातील पदभरती जाहिरात व दि.१९/०२/२०१९ चे वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले पदभरती संदर्भातील शुध्दीपत्रक.

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार आरोग्यवर्धिनी कार्यक्रमातर्गत समुदाय आरोग्य अधिकारी निवडीसाठी दि.९/०२/२०१९ रोजी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आली होती. त्यांनतर दि.१९/०२/२०१९ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते. तथापि समुदाय आरोग्य अधिकारी निवड प्रक्रियेमध्ये काही धोरणात्मक बदल करावयाचे असल्याने उपरोक्त नमुद निवड प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार सर्व संबंधितांनी आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व संकेत स्थळावर तशी सुचना प्रसारीत करावी. अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना ईमेल व्दारे अथवा एसएमएस व्दारे निवड प्रक्रिया रद्द झाल्याचे कळवावे आणि उमेदवाराचे अर्ज शुल्क घेतले असल्यास ते परत करण्यात यावे.

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,<br>
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई

प्रत सविनय सादर- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई

प्रत माहितीस्तव-

१. संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ
२. संबंधित परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ